पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत कार्यक्रमात मंगळवारी बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. समोर उपस्थित विद्यार्थी व मान्यवर.

# संधींच्या अवकाशात उंच भरारी घ्या!

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; विद्यापीठात विद्यार्थ्यांशी साधला संवाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

चांगले मित्र जोडा, नातेसंबंध जोपासा, उत्तम ज्ञान मिळवा आणि संधींच्या अवकाशात उंच भरारी घ्या. यश मिळेलच याची खात्री बाळगा. आयुष्यात कधीही आपल्या आई-वडिलांना विसरू नका. विद्यार्थी असताना ज्ञानाने समृद्ध होताना मैत्रीचे बंध निर्माण करा, अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले. मंगळवारी सायंकाळी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या दीड तासाच्या शैलीदार भाषणाला विद्यार्थ्यांनी क्षणाक्षणाला टाळ्या वाजवून प्रतिसाद दिला.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, अभ्यासक्रमाच्या सीमा भेदून ज्ञान संपादन करा. आपला सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास साधा. यावेळी डॉ. एस.आर. यादव, डॉ. पी. एस. पाटील, युवा साहित्यिक नवनाथ गोरे यांचा कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते सत्कार झाला. कार्यक्रमास डॉ. आर. के. कामत, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. ए. एम. गुरव आदींसह प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानी व्हा; संधीच्या अवकाशात उंच भरारी घ्या

## - कुलगुरू डॉ. शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

चांगले मित्र जोडा, नातेसंबंध जोपासा, उत्तम ज्ञान मिळवा आणि संधीच्या अवकाशात उंच भरारी घ्या, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठात नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ मंगळवारी सायंकाळी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात झाला. त्यावेळी या विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधताना ते बोलत होते.




**कोल्हापूर : नवनाथ गोरे यांच्या 'फेसाटी' कादंबरीला युवा साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा मानपत्र देऊन गौरव करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठातील शिक्षणानंतरच्या कालखंडात आपल्यासमोर आता कोणतेही वळण येणार नाही; तर एका विशिष्ट दिशेने आता या पुढील वाटचाल करावयाची आहे, हे ध्यानात घेऊन प्रवास आखला पाहिजे. चांगला माणूस निर्माण करणे हे शिक्षणाचे प्रयोजन असल्याचे स्वामी विवेकानंद सांगतात. चांगला माणूस म्हणजे सामाजिकदृष्ट्या सजग आणि सांस्कृतिकदृष्ट्या सक्षम मानव समाज निर्माण करणे होय. आजघडीला उच्च शिक्षणाच्या प्रवाहात देशपातळीवर १७ ते १८ टक्के विद्यार्थी येत असतात. त्यामध्ये आपला समावेश आहे, ही जाणीव ठेवून कोणत्याही आमिषांना बळी न पडता, पथभ्रष्ट न होता ध्येयाच्या दिशेने वाटचाल करा. नव्या युगात ध्येयाकडे नेणारी साधने बदलली आहेत. संशोधन, व्यवस्थापन, कौशल्य, तंत्रज्ञान ही ती चार साधने होत. त्यांचा पुरेपूर वापर विद्यार्थ्यांनी करावयास हवा.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, आपण उच्च शिक्षणासाठी विद्यापीठात दाखल झाला आहात हे खरे आहे; मात्र, अभ्यासक्रमाच्या पलीकडे वाचन, लेखन अथवा तत्सम इतर उपक्रमांत सहभागी व्हा. अभ्यासक्रमाच्या सीमा भेदून ज्ञानसंपादन करा. विद्यापीठातील आपल्या निवासादरम्यान विविध कौशल्ये आत्मसात करण्याचा प्रयत्न करा आणि आपला सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास साधा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. एस. आर. यादव यांना ई. के. जानकी अम्मल राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांचा देशातील टॉप टेन सर्वोत्कृष्ट संशोधकांत समावेशाबद्दल आणि मराठी अधिविभागाचे नवनाथ गोरे यांच्या 'फेसाटी' कादंबरीला युवा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. डॉ. नंदकुमार मोरे आणि उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी या मानपत्रांचे लेखन केले.

डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी मानपत्रांचे वाचन केले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, डॉ. डी. आर. मोरे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, इनक्युबेशन मंडळाचे संचालक डॉ. आर. के. कामत, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड उपस्थित होते.

# संधींच्या अवकाशात भरारी घ्या



शिवाजी विद्यापीठात आयोजित स्वागत समारंभात विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'चांगले मित्र जोडा, नातेसंबंध जोपासा, उत्तम ज्ञान मिळवा आणि संधींच्या अवकाशात उंच भरारी घ्या', असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठात नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ विद्यापीठाच्या लोककला केंद्रात आयोजित करण्यात आला . त्यावेळी या विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधताना ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'विद्यापीठातील शिक्षणानंतरच्या कालखंडात आपल्यासमोर आता कोणतेही वळण येणार नाही. तर, एका विशिष्ट दिशेने आता या पुढील वाटचाल करावयाची आहे, हे ध्यानात घेऊन प्रवास आखला पाहिजे. आजघडीला उच्चशिक्षणाच्या प्रवाहात देशपातळीवर १७ ते १८ टक्के विद्यार्थी येत असतात, त्यामध्ये आपला समावेश आहे, ही जाणीव ठेवून कोणत्याही आमिषांना बळी न पडता, पथभ्रष्ट न होता ध्येयाच्या दिशेने वाटचाल करा. नव्या युगात ध्येयाकडे नेणारी साधने बदलली आहेत. संशोधन, व्यवस्थापन, कौशल्य, तंत्रज्ञान ही ती चार साधने होत. त्यांचा पुरेपूर वापर विद्यार्थ्यांनी करावयास हवा.'

प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के म्हणाले, 'आपण उच्चशिक्षणासाठी विद्यापीठात दाखल झाला आहात, हे खरे आहे; मात्र, अभ्यासक्रमाच्या पलिकडे वाचन, लेखन अथवा तत्सम इतर उपक्रमांत सहभागी व्हा. अभ्यासक्रमाच्या सीमा भेदून ज्ञानसंपादन करा. विद्यापीठातील आपल्या निवासादरम्यान विविध कौशल्ये आत्मसात करण्याचा प्रयत्न करा.'

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद**

यावेळी व्यासपीठावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, डॉ. डी.आर. मोरे, डॉ. पी.एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. ए.एम. गुरव, डॉ. आर.के. कामत, डॉ. नमिता खोत, डॉ. आर.व्ही. गुरव, क्रीडा संचालक डॉ. पी.टी. गायकवाड आदी उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात 'आयएसओ'ची तयारी

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, कर्मचारी या घटकांसाठीच्या विविध शैक्षणिक, प्रशासकीय सुविधांच्या प्रमाणीकरणासाठी शिवाजी विद्यापीठ 'आयएसओ' (इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टँडर्डायझेशन, आंतरराष्ट्रीय मानांकन) मिळविणार आहे. पुढील वर्षी राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेच्या (नॅक) मूल्यांकनाच्या पूर्व तयारीतील टप्पा म्हणून विद्यापीठाने हा निर्णय घेतला आहे. त्यासाठी प्रक्रिया सुरू आहे.

नॅक समितीने मागील वेळी शैक्षणिक, प्रशासकीय आणि पायाभूत सुविधांच्या प्रमाणीकरणाबाबत विद्यापीठाला विचारणा केली होती. त्यामुळे विद्यापीठाने या विविध सुविधा आणि तेथील व्यवस्थेच्या प्रमाणीकरणाचा निर्णय घेतला. त्याअंतर्गत विविध ३९ अधिविभाग, प्रशासकीय विभाग, ग्रंथालय, आरोग्य केंद्र, वसतिगृहे, आदींचे प्रमाणीकरण केले जाणार आहे. प्रत्येक विभागासाठी समन्वयकाची नियुक्ती केली आहे. तीन महिन्यांत सर्व तयारी पूर्ण करून 'आयएसओ'साठी अर्ज दाखल केला जाणार आहे.

## राज्यातील पहिलेच विद्यापीठ

'आयएसओ' हे सर्वमान्य प्रमाणीकरण आहे. ते मिळविण्याच्या दिशेने विद्यापीठ वाटचाल करीत असल्याचे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी सांगितले. ते म्हणाले, आयएसओ मिळविल्याने त्याचा उपयोग 'नॅक'च्या मूल्यांकनावेळी निश्चितपणे होईल. गुणवत्तेच्या दृष्टीने कार्यवाही करण्यासाठी त्याची मदत होणार आहे. आयएसओसाठी सामोरे जाणारे शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील पहिलेच विद्यापीठ आहे.

## प्रक्रियेचे टप्पे असे

या 'आयएसओ'साठीची प्रक्रिया तीन टप्प्यांमध्ये होणार आहे. त्यात पहिल्यांदा सेवा-सुविधा, प्रशासकीय व्यवस्थेचे प्रमाणीकरण होईल. त्यानंतर विभागांचे अंतर्गत लेखापरीक्षण आणि अखेरच्या टप्प्यात प्रशिक्षण होईल. या सर्व प्रक्रियेमध्ये विद्यापीठ प्रशासनाचे नियोजन, कार्यवाही, तपासणी आणि पुनर्कार्यवाही, आदींवर गुणांकन होणार आहे.

> “विविध सुविधांच्या प्रमाणीकरणासाठी प्रशासनाने 'आयएसओ'साठीचे पाऊल टाकले आहे. त्यात विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, कर्मचारी, आदी विविध घटकांचे विद्यापीठातील सेवा-सुविधांबाबतचे समाधान जाणून घेतले जाणार आहे.
>
> \- डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू


लोकमत

# 'कौटुंबिक हिंसा प्रतिबंधक'ची शताब्दी

## स्त्रियांबद्दल मानवतावादी विचार : राजर्षी शाहूंचा द्रष्टेपण जगाच्या पुढे

**विश्वास पाटील ।**
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राजर्षी शाहू महाराजांनी तत्कालीन कोल्हापूर संस्थानात केलेल्या स्त्रियांना क्रूरपणाने वागविण्यास प्रतिबंध करणाऱ्या कायद्याचे शताब्दी वर्ष उद्या, गुरुवार (दि. २ ऑगस्ट) पासून सुरु होत आहे. शाहूंनी २ ऑगस्ट १९१९ रोजी हा कायदा केला आहे. त्यातून त्यांचा स्त्रियांबद्दलचा दृष्टिकोन किती विशाल व मानवतावादी होता, हेच दिसून येते. शाहूंनी एकूण ११ कलमांच्या या कायद्यान्वये स्त्रीला क्रूरपणाची वागणूक देणाऱ्या अपराध्यास सहा महिन्यांचा कारावास व २०० रुपयांपर्यंत दंड अशी शिक्षा ठोठावण्याची तरतूद केली होती.



**शाहूंची दूरदृष्टी :** कौटुंबिक हिंसाचाराबद्दल शाहूंनी केलेल्या कायद्यानंतर ८६ वर्षांनी भारताने हा कायदा केला. शाहूंच्या पुढाकाराने १९१३ मध्ये कोल्हापुरात 'दि कोल्हापूर अर्बन को-ऑप सोसायटी' (सध्याची कोल्हापूर अर्बन बँक) स्थापन केली व त्यानंतर शंभर वर्षांनंतर २०१३ ला 'युनो'ने आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष जाहीर केले. शाहू महाराज काळाच्या किती पुढे होते, हे स्पष्ट होते.

> स्त्रियांवरील हिंसाचार रोखणारा कायदा करणारे शाहू महाराज हे स्वतंत्र भारतातीलच नव्हे तर जगातील पहिले राजे असू शकतील. भारतात सन २००५ ला कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा झाला. यातून शाहूंचे द्रष्टेपण अधोरेखित होते. **- डॉ. भारती पाटील,**
> राज्यशास्त्राच्या अभ्यासक

शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई पवार अध्यासनातर्फे त्यानिमित्त उद्या, गुरुवारीच विद्यापीठात एक दिवसाची कार्यशाळा होत आहे. स्त्रियांवरील अत्याचारापासून ते कौटुंबिक हिंसाचारापर्यंत आज समाजमन सजग झाले असले तरी शंभर वर्षांपूर्वी स्त्रियांच्या हक्कांबाबत, त्यांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीबाबत शाहू महाराज किती संवेदनशीलतेने विचार करीत होते व नुसता विचारच न करता त्या विचाराला कायदेशीर रुप देऊन समाजाला वळण लावण्याचा प्रयत्न करीत होते, याचेच प्रत्यंतर या कायद्यातून येते.

अनेक कुटुंबांत नवरा व त्याचे नातलग यांच्याकडून नानाप्रकारे स्त्रियांचा छळ होत असे. उच्चभ्रू समाजातील स्त्रियांना तर त्याबद्दल 'ब्र'ही काढता येत नसे. त्याची दखल घेऊनच महाराजांनी हा कायदा केला. स्वतंत्र भारतात हाच कायदा २००५ ला झाला.

शाहू या कायद्याबद्दल म्हणतात की,'हिंदुस्थानात (पान २ वर)

पुण्य नगरी

# शिवाजी विद्यापीठामध्ये कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्रातर्फे दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता 'छत्रपती शाहूंचा कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधाचा कायदा आणि आजचे वास्तव' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये करण्यात आले आहे. छत्रपती शाहू महाराजांनी २ ऑगस्ट, १९१९ रोजी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध हा क्रांतिकारी कायदा केला. जगातील अशा प्रकारचा कायदा करणारे छत्रपती शाहू महाराज हे पहिले राजे होत. या घटनेला २ ऑगस्ट, २०१९ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. १०० वर्षापूर्वी कौटुंबिक हिंसाचाराबद्दलचा कायदा करून छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या दूरदृष्टीची आणि पुरोगामित्वाची प्रचिती दिली. या कार्यशाळेचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले.

पुढारी

# एम.फील.,पीएच.डी. प्रवेश तारखेत बदल

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल., पीएच.डी. प्रवेश परीक्षेचे नियोजन दि. ८, ९ व १० ऑगस्ट २०१८ रोजी यापूर्वी जाहीर करण्यात आले होते. परंतु, दि. ९ ऑगस्ट रोजी मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र बंद असण्याची शक्यता विचारात घेऊन विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने प्रवेश परीक्षा दि. ८, १० व दि. ११ ऑगस्ट २०१८ या तारखांना होतील. त्याचप्रमाणे या तारखांनुसार प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येत आहे. सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी तसेच विद्यापीठाच्या वेबसाईवर प्रसिद्ध होणाऱ्या सूचना पाहाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.